Prof Dr. V.E. Dongaonkar

Buddhism

The Way Towards Perfect Humanity



Editor

Yeshodhara Hadke

मा. डॉ. वेदप्रकाश डोंगरवार

Buddhism

The Way Towards Perfect Humanity

■ Editor ■
Yeshodhara P. Hadke

■ Co- Editor ■
M. S. Wankhede

■ Editorial Board ■

Ratnakar Bhelkar
Anuradha Kherdekar
Meera Singh Kakan
Jyoti Khadse
Ravindra Shobhane
Dnyaneshwar Shambharkar
Bipasha Battacharya-*Ghoshal*
Lata Murkute

■ Published by ■
Dr. B. B. Taywade, Principal,
Dhanwate National College, Congress Nagar, Nagpur - 440 012
Affiliated to Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur
Tel. 0712-2422759 Fax : 0712-2454193
Email : dhanwatenationalcollege@yahoo.com
Website : www.dncnagpur.com

Published by :
Dr. Baban Taywade, Principal,
Dhanwate National College, Congress Nagar, Nagpur - 440 012
Tel. 0712-2422759 Fax : 0712-2444193
Email : dhanwatenationalcollege@yahoo.com
Website : www.dncnagpur.com

Affiliated to Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University, Nagpur, MS (INDIA)

Copyright © the Editor
Copyright © All rights reserved. No part of this publication may be reproduced, strored in a retrieval system or transmitted in any form or by any means electronic, mechanical, photocoping recording or otherwise without the prior permission of the Editor.

The papers included in this publication have been directly reproduced, with minimum editorial intervention, from the files sent by the respective authors. Opinions expressed in the selected research papers are those of contributors and do not necessarily reflect the views of seminar proceedings publication committee. The editorial board or college is not responsible for any consequences relating to any information contained therein.

Edition: 2011
ISBN -13-987-81-921416-5-7
Typesetting & Printed by
Dinesh Graphic
54-G Vishnu Apartment, Shop No. 3
Trimurti Nagar, Nagpur-440 022
Ph. 9422119631

C) MARATHI SECTION 310 - 492

91. **बौद्ध दर्शनातील नीतिशास्त्र आणि मानसशास्त्र** 310
भाऊसाहेब पांडुरंग काळे

92. **बौद्ध धम्मातील मानसशास्त्र आणि नीतिशास्त्र विषयक विचार** 315
राजकुमार मून

93. **बुद्ध तत्त्वज्ञानातील नैतिक आणि मानसशास्त्रीय विचार** 321
यशोधरा हाडके, प्रदीप हाडके

94. **बुद्धधम्म आणि नैतिकता एक मानसशास्त्रिय दृष्टिकोन** 325
वर्षा आनंद वासनिक

95. **सामाजिक दृष्टकोनातून बौद्ध नीनिशास्त्राचे विश्लेषण** 328
वेदप्रकाश डोणगावकर

96. **बुद्ध धम्मातील नीतिशास्त्र आणि मानसशास्त्र** 331
केवट हरिदास कऱ्हाडे, गणेश जनार्धन गायकवाड

97. **बौद्धधम्म आणि नैतिकता** 334
माधुरी पी. पाटील

98. **बुद्धकालीन वज्जी : संदर्भ आणि बोध** 337
शत्रुघ्न जाधव

99. **बुद्धधम्म : मानवतावादी जीवनमार्ग** 340
युवराज मानकर

100. **बुद्ध आंबेडकरांचा मानवताभिमुख धम्म** 344
प्रियराज महेशकर

101. **बौद्ध धर्माची तत्त्वे व तत्त्वज्ञान** 347
प्रज्ञा भा. कामडी

102. **बौद्ध धम्म व तत्त्वज्ञान** 349
दिनकर भा. तायवाडे, विजय डाखोडे

103. **अष्टांगिक मार्ग : एक जीवन मार्ग** 352
सुनिल अंबादासपंत काळमेघ

104. **मानवी कल्याणाचा मार्गः बौद्ध धम्म** 354
दिगांबर कापसे, निलीमा कापसे

105. **गौतम बुद्धाचा आचरणविषयक मार्ग आणि मानवता** 357
राजेसाहेब मारडकर

106. **बौद्ध धम्मातील मानवतावादी तत्त्वज्ञान** 360
गोपीचंद वाय. कठाणे

107. **बुद्धांचे राजकीय विचार** 362
प्रवीण के. कोहळे

108. **बुद्धधम्मातील राजकीय आणि सामाजिक विचार** 368
भुषण रामटेके

109. **डॉ. आंबेडकर प्रणित बुद्धीझममधील सामाजिक-आर्थिक न्याय आणि मानवता एक आकलन** 371
मोहन नगराळे

सामाजिक दृष्टिकोनातून बौद्ध नीतिशास्त्राचे विश्लेषण

वेदप्रकाश डोणगावकर*

समाज ही एक महत्वपूर्ण संस्था आहे. समाजामध्ये अनेक घटकांचा विचार केला जातो. त्यात मानवाचे स्थान श्रेष्ठ आहे. कारण मानव बुद्धिवान प्राणी आहे. बुद्धीचे एक कार्य विवके जागृत ठेवणे आहे. अर्थात मानव चांगल्या आणि वाईट यामध्ये भेद करीत असतो. मात्र वर्तमान स्थितीचे सुक्ष्म निरीक्षण केल्यास असे लक्षात येईल की, मानव चांगले- वाईट जाणत असून त्यापैकी चांगले तेवढे स्विकारण्या ऐवजी वाईटाकडे अर्थात वाईट मार्गाने स्वार्थ साधण्याकडे लक्ष केंद्रीत करीत आहे. परिणामी समाजात विषमता, जातीयवाद, आतंकवाद, बेरोजगारी, महिला अत्याचार आणि सर्वात महत्वाचे म्हणजे भ्रष्टाचार आदी समस्या वाढत चालल्या आहेत. यासर्वाचे कारण म्हणजे समाज जीवनात असलेला नैतिकतेचा अभाव होय.

नैतिकता ही मानवाला सदैव सदाचाराने वागण्यास प्रेरित करते. इतकेच नव्हेतर नैतिकतेमुळेच आदर्श समाजाची निर्मिती होते आणि त्या समाजाच्या रक्षणाकरिता मुल्याधिष्ठित यंत्रणेची उभारणी ही होते. परिणामी समाजातील प्रत्येक घटक मुक्त आणि स्वच्छंद वातावरणात वावरत असतो आणि स्वतःचा विकास साधत असतो. परंतु हे सर्व तेव्हाच शक्य आहे. ज्या वेळी समाजात नैतिकता नांदेल. आज समाज जीवनातून नैतिकता लोप होत चालली आहे. अशा परिस्थितीत 'पर्यावरणा' प्रमाणेच 'नैतिकतेला' ही आवश्यक मानून शिक्षणाच्या माध्यमातून समाज जीवनात ती रूजविण्याचा पुरेपुर प्रयत्न केला पाहिजे. तेव्हा या संदर्भात बौध्दांच्या नीतिशास्त्राचा विचार सामाजिक दृष्टीकोणातून या ठिकाणी करणे अवचित्याचे आहे.

आर्यसत्य

1. दुःख 2. दुःख कारण 3. दुःख निरोध 4. दुःख निरोध मार्ग, हेच बौध्दाचे चार आर्यसत्य आहेत. पहिले सत्य मनुष्याला नैराश्याकडे नेणारे असले तरीही ते एक वास्तविक सत्य आहे. म्हणुन मनुष्याने या सत्याचा स्विकार करावा आणि आशावादी दृष्टीकोन बाळगावा, आपल्या आयुष्यात दुःखाची निर्मिती कशी झाली घ्याचा विचार करावा. अर्थात दुःखांच्या कारणांचा शोध घ्यावा. कारण प्रत्येक दुःखाला विरोध करता येतो. तेव्हा दुःखाला विरोध करण्या करीता किंवा दुःखाला समूळ संपविण्याकरिता बौध्दानी अष्टांग मार्गाची मांडणी केली आहे.

अष्टांग मार्ग

बौध्दांच्या मते मानवी जीवनात निर्माण झालेली दुःख संपविण्यासाठी एकूण आठ मार्ग आहेत.

1. सम्यक् दृष्टी :

याठिकाणी दृष्टी या शब्दाचा अर्थ ज्ञानाशी आहे. म्हणजे मनुष्याने उचित ज्ञान प्राप्त केले पाहिजे. प्राप्त केले जाणारे ज्ञान वास्तवावर आधारित असले पाहिजे. ते प्राप्त करीत असतांना भावणे पेक्षा अधिक बुध्दीला महत्व दिले पाहिजे. बौध्दांनी चार आर्य सत्याचे ज्ञान वास्तवावर अधारलेले असल्याचे दाखवून दिले.

2. सम्यक् संकल्प :

याठिकाणी संकल्प या शब्दाचा अर्थ 'निश्चय' असा आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात मनुष्य, समोर आलेल्या परिस्थितीशी हात मिळवणी करीत आहे. त्यात तो तत्त्व, मूल्य यांच्या कडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. तो दृढ निश्चयी होवून परिस्थितीवर मात करण्याऐवजी माघार घेणे पसंत करीत आहे. परिणामी तो दुःखाला निमंत्रण देतं आहे. तेव्हा मनुष्याने उचित संकल्प करूण निर्माण होणऱ्या दुःखापासून स्वतःचा बचाव करावा. संकल्प करण्याची क्रिया ही आंतरिक क्रिया असून ही क्रिया योग्य प्रकारे पार पाडल्यास मनुष्याला आत्मिक समाधान लाभते.

3. सम्यक् वाचा :

मिथ्या टाळणे आणि सत्याचा स्वीकार करणे हा मनुष्याचा मुळ गुण आहे आणि या गुणाचा विकास करण्याची अपेक्षा बौध्दानी या

ठिकाणी व्यक्त केली आहे. मनुष्य स्वार्थापोटी खोटे बोलतो आणि त्याचा परिणाम भविष्यात भोगतो. अर्थात त्याची ही मिथ्यावाचा त्याच्या दुःखाचे कारण बनते. म्हणूनच बौध्दानी मनुष्याला दुःखा पासून वाचण्यासाठी सत्य बोलण्याचा उपदेश केला आहे.

4. सम्यक् कर्म :

नियमाने केलेले कर्म हेच सम्यक् कर्म होय. आज मनुष्य इतका स्वार्थी झाला आहे की, तो सामाजिक आणि संवैधानिक नियमांना पायधुळी तुडवत आहे. परिणामी कायद्याचे नैतिकतेवर आधारित असलेले राज्य पूर्ण पणे अस्तित्वात येण्याऐवजी दुसरेच चित्र पाहावयास मिळत आहे. समाज भौतिक आणि औद्योगिक दृष्ट्या प्रगत होत आहे. मात्र त्याच बरोबर समाजात हिंसाचारी, दुराचारी आणि द्रोही वृत्तीच्या लोकांचे ही प्रमाण वाढत चालले आहे. अशा लोकांमुळे समाजामध्ये अराजकता निर्माण होत चालली आहे. समाजामध्ये नैराश्याची, चिंतेची भावना वाढत चालली आहे. परिणामी समाजातील अनेकानेक लोकांच्या वाट्याला दुःख येत आहे. अशा परिस्थीतीत बौध्दांच्या सम्यक् कर्माचा विचार भौतिक प्रगती बरोबर नैतिक प्रगतीही साधणार आहे.

5. सम्यक् अजीविका :

अजीविकेसाठी उपजीविका हा शब्द याठिकाणी वापरता येईल. उपजीविकेसाठीच कर्म केले जातात. अर्थात उपजीविकेच्या दृष्टिकोनातून कर्माची योग्यता ठरवली जाते. तेव्हा उचित कर्मसाठी उचित उपजीविका कारणीभूत असते. म्हणून बौध्दांनी योग्य उपजीविकेची आपेक्षा व्यक्त केली आहे. आज काही लोक कत्तलखाने चालवून, मास विक्री करून, चोरी करून, मद्यविक्री करून, शास्त्रांची विक्री करून आपली उपजीविका चालवतात. त्यासाठी ते लोक खोटे बोलणे, धोका देणे, अत्याचार, हिंसा, दहशत पसरविणे आदिंचा सर्रास वापर करतात. परिणामी ते लोक संतुष्ट ही होतात. परंतु त्यांच्या या कृती मुळे इतर लोक मात्र दुःखी होतात. या दुःखी लोकांमध्ये त्यांच्या कुटुंबियांचाही समावेश असतो. तेव्हा या अनाचारी, कुकर्मी लोकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, आपल्यासोबतही

धोकाधाडी, अत्याचार, चोरी, यासरख्या घटना घडू शकतात. म्हणून आपली उपजीविकाच सत्य मार्गाने चालविली तर सर्व काही व्यवस्थित चालेल. याचे भान समाजातील सर्व लोकांनी ठेवणे गरजेचे आहे. या दृष्टिकोनातून बौध्दांच्या सम्यक् अजीविकेचा विचार मार्गदर्शक आहे.

6. सम्यक् व्यायाम :

या ठिकाणचा व्यायाम हा शब्द शारिरीक निरोगाशी संबधीत नसून मानसिक निरोगाशी आहे. मनुष्याचे कर्म हे प्रामुख्याने मनावर अवलंबून असतात. तेव्हा मनाला वाईट संस्कारांपासून सुरक्षित ठेवणे आवश्यक असते. यासाठी बौध्द दर्शनात काही उपाय सांगितले आहेत. ते पुढील प्रमाणे

1. शुभ विचारांचे ध्यान करणे.
2. अशुभ विचारांचा आणि त्या द्वारे होणा-या कृतीच्या परिणामाचा विचार करणे.
3. ज्यापासून अशुभ विचारांची निर्मीती होऊ शकते त्याकडे दुर्लक्ष करणे.
4. योगाच्या साहय्याने मनावर निंयत्रण ठेवणे. बौध्द दर्शनात सांगीतलेल्या याबाबी आचरणात आनने म्हणजेच सम्यक व्यायाम होय.

7. सम्यक् स्मृती :

आज मनुष्य अत्यंत मोही झाला आहे. त्याला यां जगताशी, जीवनाशी, आप्तजनाची इतकी सक्ती झाली आहे की, परिणामी या पैकी कुठल्याही एखाद्या बाबीचा विरह झाला तर तो दुःखी होत आहे. तत्पुर्वी तो यापासून दूर होण्याच्या विचारानीच चिंतीत होवून दुःखाच्या सागरात खेचला जात आहे. म्हणून हे जगच क्षणिक आहे, दुःख हे सत्य आहे. या बौध्द विचारांचे स्मरण ठेवून निर्माण होण-या दुःखमध्ये गुरफटून बसण्याऐवजी दुखाला सामोरे गेले पाहिजे आणि त्यावर मात केली पाहिजे. हेच बौध्दानी सम्यक् स्मृतीतून सुचविले आहे.

8. सम्यक् समाधि :

चित्ताला एकाग्र ठेवण्यासाठी ही एक ध्यानाची अवस्था आहे. उपरोक्त सात मार्ग मनुष्याला आयोग्य चित्तवृत्तीचा विरोध करण्यास प्रेरीत करतात. अर्थात या सर्व अवस्था सम्यक् समाधि अवस्थेपर्यत मनुष्याला पोहचवितात. या अवस्थेत निर्वाण प्राप्त करता येते. मात्र

त्यासाठी साधकाला चार अवस्थेतून जावे लागते. त्या अवस्था पुढील प्रमाणे

1. चार आर्यसत्याचे तर्क-वितर्क पूर्वक चिंतन, मनन करावे लागते.
2. त्याची चार आर्यसत्याप्रती श्रध्दा निर्माण होते आणि तो आनंदाचा अनुभव घेत असतो.
3. त्याच्या मनामध्ये आनंदाच्या प्रती उपेक्षेची भावणा निर्माण होते.
4. शेवटी साधकाच्या चित्त वृत्तीचा पूर्णपणे निरोध होतो, त्याचे चित्त पूर्णपणे शांत होते. ही शांतीची अवस्थाच निर्वाण अवस्था आहे आणि हेच सम्यक् समाधिचे ध्यैय आहे.

ब्रह्म विहार प्रामुख्याने ब्रह्म विहारामध्ये बौध्दांनी मैत्री, करुणा, मुदिता व उपेक्षा या बाबीना महत्व दिले आहे.

1. **मैत्री** - प्रत्येक जीवाच्या प्रती स्नेहभाव असणे म्हणजे मैत्री होय. यात सामाजिक कल्याणला महत्व दिले गेले आहे.
2. **करूणा**- करुणा हे अद्वेष, अमोह, आणि काम या विषयांच्या संदर्भाने वैराग्याची भावणा आहे.बौध्द धर्मामध्ये सामाजिक दृष्टिकोनातून याला महाकरुणा असा शब्द प्रयोगीला जातो.
3. **मुदिता**- हा पूर्णपणे जाणिवेचा विषय आहे. हा मनाची व्यापकता प्रकाशित करणारा विषय आहे. दुस-याचे सुख ते आपले सुख, दुस-याचे दुःख ते आपले दुःख अशी भावना म्हणजेच मुदिता होय.
4. **उपेक्षा** - ही समतेची, उदारतेची भावना आहे. या ठिकाणी कोणीही प्रिय किंवा अप्रिय नसतो. या अवस्थेत मनुष्याला शत्रुही मित्र वाटू लागतो. अर्थात मनुष्याच्या अशुभ वृत्तीमध्ये परिवर्तन घडवुन आणण्याची ही एक पध्दती आहे. असेही याठिकाणी म्हणता येईल.

अशा प्रकारे बौध्द नीतिशास्त्रामध्ये सर्वप्रथम मनुष्याला सत्याचे ज्ञान देण्यात आले आहे. त्यांनतर त्याला वैयक्तीक दुःखपासून परावर्त करण्याचा मार्ग सांगितला आहे.निश्चितच या अवस्थेनंतर मनुष्य सामाजिक जाणिवेला प्राधान्य देत असतो. म्हणजेच सामाजिक जाणिव वृर्धीगत करण्यासाठी बौध्द दर्शनात ब्रह्म विहाराचा विचार अत्यंत उपयुक्त आहे.

निष्कर्श :

आज मनुष्य स्वतःचा आणि स्वतःच्या कुटूंबाचा अधिकाधिक विचार करीत आहे. त्याच्या ठिकाणी सामाजिक जाणिवेचा पूर्णतः अभाव दिसत आहे. तो स्वतःचा आणि स्वतःच्या कुटुंबाच्या सुखासाठी अहोरात्र धडपड करीत आहे. तो या अनित्य जगताला आणि क्षणभराच्या सुखाला सत्य मानत आहे. बौध्दाच्या मते हे मनुष्याचे अज्ञान आहे. तेव्हा जगताचे वास्तविक स्वरुप हे क्षणिक आहे हे समजून घेतले पाहिजे. त्या दृष्टिकोनातून बौध्दाच्या क्षणिकवादाचे आणि चार आर्यसत्याचे चिंतन केले पाहिजे.

समाजिक जीवनात वैयक्तीक रित्या सुख प्राप्त करण्यासाठी बौध्दांनी आष्टांग मार्गाचा उपदेश केला आहे. त्यांचा हा वैयक्तिक मुक्तीचा विचार, प्रचार आणि प्रसाराणे सामाजिक होवू शकतो. बौध्दांच्या या आष्टांग मार्गाच्या आवस्थेनंतर मनुष्य विरक्त, निरमोही बनतो. त्याला कोणत्याही प्रकारची असक्ती राहत नाही. तो पूर्णपणे समाज कल्याणाच्या विचारात रममान होतो. त्या अवस्थेला ब्रह्म विहाराची अवस्था म्हणतात. बौध्दांचा ब्रह्म विहाराचा विचार म्हणजे सामाजिक जाणिवेचा परिपाक होय.

मनुष्याच्या दुःखासाठी स्वतः तोच जवाबदार आहे. जोपर्यंत तो आपल्या वासनांपासून, मोहापासून दूर होणार नाही तोपर्यंत ख'-या अर्थाने तो मुक्त होणार नाही. बौध्दांनी मनुष्याच्या मुक्तीसाठी अष्टांगमार्ग, ब्रह्म विहार या मुलभूत नैतिक विचारांची मांडणी केली आहे. तेव्हा या नैतिक विचारांचा मानवाने आपल्या आचरणातून स्वीकार केल्यास निश्चीतच समाज जीवन संतुलीत, व्यवस्थित आणि सौख्याने राहील.

संदर्भ ग्रंथ :

1. जोशी ग.ना., भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद इतिहास, शुभदा सारस्वत प्रकाशन, पुणे, 1988
2. दीक्षित श्री ह. , भारतीय तत्त्वज्ञान, फडके प्रकाशन, कोल्हापूर, 1996
3. निगम डॉ.शोभा , भारतीय दर्शन, मोतीलाल बनारसीदास, पुणे, 2002
4. कवी माधवी , भारतीय नीतिशास्त्र, स्वाती प्रकाशन, पुर्णा 2004
5. धर्माधिकारी हेमचंद्र , सामाजिक तत्त्वज्ञान, भारत मुद्रक आणि प्रकाशक लि. औरंगाबाद, 1998

● Published by ●
Dr. Baban Taywade, *Principal*,
Dhanwate National College, Nagpur-12
Affiliated to Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University, Nagpur, MS (INDIA)

Edition : 2011

ISBN 13 - 978-81-921416-5-7